



## लष्करात भरती झाल्याचे बनावट पत्र देणाऱ्यांसह ६ जण ताब्यात

**अहमदनगर :** लष्करामध्ये भरती झाल्याचे बनावट पत्र देऊन भरती होणारे व भरती करून देणाऱ्यांची आंतरराज्यीय टोळी भिंगार पोलिसांनी जेरबंद केली. उत्तरप्रदेशातून अग्निवीरमध्ये भरती झाल्याचे सांगून नगर येथे प्रशिक्षणासाठी आलेल्या चार जणांचे नियुक्तीपत्र बनावट असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी भिंगार कॅंप पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.



आदर्श नांगेलाल कुंशवाह (१९, रात्योरा, ता. कोरॉन, जि. प्रयागराज, उत्तरप्रदेश), मोहितकुमार माणिकलाल यादव (२५, कासीमाबाद, सारंगपूर, ता. कररचना, जि. प्रयागराज, उत्तरप्रदेश), आनंद श्यामनारायण शर्मा (२३, साडवा, ता. करचना, जि. प्रयो–गराज, उत्तरप्रदेश), अंशू राजेंद्रकुमार तेजपालसिंग (उत्तरप्रदेश) असे बनावट नियुक्तीपत्र असलेल्यांची नावे आहेत.

याबाबत सुभेदार शिवाजी काळे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात लोकेशकुमार तेजपालसिंग (२५), व गोपाल रामकिसन चौधरी (उत्तरप्रदेश) यांनी वरील चौघांकडून नोकरीचे आमिष दाखवून साडेसात लाख घेऊन बनावट नियुक्तीपत्र दिले होते. या दोघांनाही त्यांचा शोध घेऊन नगर शहरातून ताब्यात घेतले आहे. यातील लोकेशकुमार हा सैन्यदलातील अधिकाऱ्यांचा गणवेश परिधान करून तोतयागिरी करीत होता. या सर्वांना ताब्यात घेतले असून, न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने ५ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. याप्रकरणी भिंगार कॅंप पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## बारावीच्या निकालात मुलींचाच डंका, जिल्हा पुणे विभागात दुसरा

**अहमदनगर** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल काल (गुरुवारी) जाहीर झाला. या निकालात जिल्हा पुणे विभागात दुसरा असून, ९२.६३% निकाल लागला आहे. निकालामध्ये मुलीच अव्वल ठरल्या आहेत. परीक्षेस बसलेल्या एकूण ६२ हजार ७३९ विद्यार्थ्यांपैकी ५८ हजार १२० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

जिल्ह्यातून बारावीच्या परीक्षेसाठी एकूण ६२ हजार ७३९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी प्रत्यक्षात ६२ हजार ७३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यात ३६ हजार ६१६ मुले तर २६ हजार १२३ मुलींचा समावेश होता. त्यापैकी ३३ हजार १४२ मुले (९०.५१%) तर २४ हजार ९७८ मुली (९५.६१%) असे ५८ हजार १२० विद्यार्थी (९२.६३%) उत्तीर्ण झाले. त्यात कला शाखेचा निकाल ८५.०६% लागला आहे. परीक्षेस बसलेल्या १६ हजार ८५६ विद्यार्थ्यांपैकी १४ हजार ३३९ विद्यार्थी पास झाले. शास्त्र शाखेचा निकाल सर्वात जास्त ९७.६१% असून, परीक्षेस बसलेल्या ३५ हजार ३७१ विद्यार्थ्यांपैकी ३४ हजार ४६८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वाणिज्य शाखेचा निकाल ९४.४८% असून, परीक्षेस बसलेल्या ८ हजार १८० विद्यार्थ्यांपैकी ७ हजार ७२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

पुणे विभागाचा एकूण निकाल ९२.०७% लागला असून, त्यात सोलापूर जिल्ह्याचा निकाल ९३.६९% असून, तो विभागात पहिला आहे तर पुणे जिल्ह्याचा निकाल ९१.१४% असून, तो पुणे विभागात तिसऱ्या क्रमांकावर आहे.

जिल्ह्यातून सर्वांत जास्त शेवगाव तालुक्याचा निकाल असून, तेथे ९८.०६% सरासरी आहे तर सर्वांत कमी निकाल अकोले तालुक्याचा ८९.४१% आहे. तालुकानिहाय निकाल पुढीलप्रमाणे : अकोले ८९.४१, जामखेड ९६, कर्जत ९७.२१, कोपरगाव ९४.९५, नगर तालुका ९५.०८, नेवासे ९३.८, पारनेर ९३.९२, पाथर्डी ९२.२१, राहाता ९२.०२, राहुरी ९२.२३, संगमनेर ९२.७१, शेवगाव ९८.०६, श्रीगोंदा ९३.०४, श्रीरामपूर ८९.९८ टक्के.

## आयुक्तांनी घेतली आपत्कालिन व्यवस्थापन समितीची बैठक



**अहमदनगर :** महापालिकेचे आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी आपत्कालीन व्यवस्थापन समितीची बैठक बोलावून सर्व अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. शहरामध्ये पावसाळ्यापूर्वी सर्व स्तरावर उपाययोजना करून सर्वांनी सज्ज रहावे, जेणेकरून कुठलीही दुर्घटना घडणार नाही, असे आदेश त्यांनी दिले. जावळे म्हणाले, शहरातील ओढे–नाले साफ करून पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग मोकळा करून द्या. त्याचबरोबर शहरातील गटारींची स्वच्छता करावी. जेणेकरून पाणी तुंबणार नाही. पावसाळ्यापूर्वी औषध फवारणीची तयारी करून ठेवा. जेणेकरून कुठली रोगराई पसरणार नाही. शहरातील खराब चेंबरचा सर्व्हे करून घ्यावा व तातडीने दुरुस्तीचे काम मार्गी लावावे. धोकादायक इमारतींचा सर्व्हे करून त्या उतरून घ्याव्यात व त्याठिकाणी सूचनाफलक लावावेत. मनपाच्या सर्वच विभागांनी सज्ज रहावे, असे ते म्हणाले. यावेळी शहर अभियंता मनोज पारखे, नगररचनाकार राम चारठणकर, नगरसचिव तडवी, अतिक्रमण विभागप्रमुख सुरेश इथापे, अग्निशामक दलप्रमुख शंकर मिसाळ, प्रभागाधिकारी मेहर लहारे, घनकचरा विभागप्रमुख किशोर देशमुख, प्रभागाधिकारी नाना गोसावी, रमेश कोतकर, अशोक साबळे, प्रसिद्धीप्रमुख शशिकांत नजान, डॉ. दळवी आदी उपस्थित होते.

## भरधाव टेम्पोच्या धडकेत दोन महिलांचा मृत्यू, तिघे जखमी

**अहमदनगर :** भरधाव वेगात जाणाऱ्या टेम्पोने दिलेल्या धडकेत पायी जाणाऱ्या २ महिलांचा मृत्यू झाला तर तिघे जखमी झाले. ही घटना बुधवारी दुपारी साडेचार वाजता नगर–जामखेड रोडवर हॉटेल जय मल्हारसमोर घडली. याप्रकरणी अनोळखी टेम्पो चालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वत्सलाबाई भानुदास चांदणे (निंबोडी, ता. नगर) असे मृत महिलेचे नाव असून, शकुंतला चांदणे यांचाही रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. सूरज शेंडगे, दक्ष शेंडगे, सपना शेंडगे (सर्व निंबोडी, ता. नगर) अशी जखमींची नावे आहेत.

याप्रकरणी सपना शेंडगे यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. टेम्पोवरील (एमएच १६ एवाय ४१६०) अनोळखी चालकाने भरधाव वेगात टेम्पो चालवून पायी जाणाऱ्या वत्सलाबाई व शकुंतला चांदणे यांना पाठीमागून जोराची धडक दिली. त्यानंतर टेम्पोने दुचाकीला धडक दिली. त्यामध्ये सूरज शेंडगे, दक्ष शेंडगे व सूरज शेंडगे हे जखमी झाले.

## रस्त्याच्या निकृष्ट कामावरून शहर कॉंग्रेसचे मध्यरात्री अनोखे आंदोलन

**अहमदनगर** : शहरातील निकृष्ट रस्त्यांचा भांडाफोड शहर कॉंग्रेसकडून सुरू आहे. बुधवारी मध्यरात्री शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांच्या नेतृत्व–खाली शहराच्या मध्यवस्तीत असणाऱ्या बाजारपेठेतील रस्त्यावर कॉंग्रेसने आंदोलन केले. शनी चौक ते होशिंग हॉस्पिटलदरम्यान मनपाने प्रभाग १२ मध्ये केलेला सिमेंटचा रस्ता अवघ्या ४–५ महिन्यांत गायब झाला आहे. या रस्त्यावर 'भ्रष्टाचाऱ्यांना ७०% रस्त्याला ३०%' असे लिहीत कॉंग्रेसने नगरकरंच्यावतीने मनपा, ठेकेदार, लोकप्रतिनिधींचा निषेध केला.




आंदोलनात मनोज गुंदेचा, संजय झिंजे, अभिनय गायकवाड, सुजित क्षेत्रे सहभागी झाले होते. नागरिकांच्या रोजच्या आयुष्यातील जगण्या–मरणाशी निगडित असणाऱ्या रस्त्यासारख्या ज्वलंत सार्वजनिक प्रश्नाला कॉंग्रेसने वाचा फोडली. रस्त्याच्या कामांत ७०% कमिशन खाणे सुरू आहे. केवळ ३०% रक्कम प्रत्यक्षात रस्त्यावर खर्च केली जाते. मग हे रस्ते कसे दर्जेदार होतील, असा सवाल काळे यांनी केला.

हा वर्दळीचा रस्ता आहे. भिंगारवाला चौक ते कोतवाली पोलिस स्टेशन ते जुन्या मनपाच्या चौकापर्यंत रस्त्याची दुरवस्था झालेली आहे. हा रस्ता व्हावा अशी व्यापारी व नागरिकांची गेल्या अनेक दिवसांपासूनची मागणी होती. मात्र काही महिन्यांपूर्वी मनपाने लोकप्रतिनिधींच्या आग्रहातून सिमेंट कॉंक्रीटीकरण करत शनि चौक ते होशिंग हॉस्पिटलदरम्यानचा रस्ता पूर्ण केला. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला. मात्र हा दिलासा औटघटकेचा ठरला असून, रस्ता गायब झाला आहे. येत्या पावसाळ्यात उरलेला रस्ताद–खील पूर्ण वाहून जाईल. नगरकरांच्या तोंडाला भ्रष्टाचाऱ्यांकडून पाने पुसली जात असल्याचा आरोप काळे यांनी केला.

दरम्यान, कॉंग्रेसने निकृष्ट काम झालेल्या रस्त्यावरच लिहीलेले घोषवाक्य या रस्त्याने ये–जा करणारे नागरिक थांबून वाचत आहेत. कॉंग्रेसच्या या अनोख्या आंदोलनाची शहरभर चर्चा सुरू झाली आहे.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जिल्ह्यात विविध कार्यक्रम

**अहमदनगर :** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज (शुक्रवारी) जिल्ह्यातील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच भाजपच्या मेळाव्यास मार्गदर्शन करणार आहेत. गुरुवारी रात्रीच ते शहरात मुक्कामी येणार आहेत.

सकाळी येथील नूतन शासकीय विश्रागृहाचे भूमिपूजन करून इतर विविध विकासकामांचा शुभारंभदेखील ते करणार आहेत. या कार्यक्रमानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्याचा आढावा घेणार असून, या आढावा बैठकीनंतर भाजपच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या पदाधिकारी मेळाव्यास ते संबोधित करणार आहेत. हा मेळावा पारिजात चौकातील कोहिनूर मंगल कार्यालय येथे होणार आहे. मेळाव्यात केंद्रातील मोदी सरकारला सत्तेत येऊन ९ वर्षे झाली त्यानिमित्त ३० मे ते ३० जूनदरम्यान जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानासंदर्भात ते पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. या मेळाव्यानंतर शिर्डी येथील समृद्धी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण त्यांच्या हस्ते होणार आहे. या सोहळ्यास ते उपस्थित राहणार आहेत.

या सर्व विकास कार्यक्रमांस तसेच पक्षाच्या मेळाव्यास सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन भाजपच्यावतीने करण्यात आले आहे.








# शेतीत निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शास्त्रज्ञांनी शोधावी : सत्तार




**राहुरी, (वार्ताहर)** : आता पूर्वीसारखी शेती राहिलेली नाही. शेतीसमोर माती, प्रदुषीत पाणी व वातावरण बदलासारखे मोठे प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्यावर उत्तर शोधण्याची जबाबदारी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांची आहे. राज्यातील कृषि विद्यापीठांनी विविध पिकांमध्ये संशोधन करून नवनविन वाण तयार करावेत असे आवाहन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले.

याप्रसंगी या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पोकराचे प्रकल्प संचालक डॉ. परिमलसिंग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, सोलापूर येथील राष्ट्रीय डाळिंब संशोधन संस्थेचे संचालक डॉ. आर. ए. मराठे, तीनही विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत (दापोली), डॉ. इंद्र मणी (परभणी), डॉ. शरद गडाख (अकोला), कार्यकारी परिषद सदस्य गणेश शिंदे, दत्तात्रय उगले, महाबीजचे कार्यकारी संचालक सचिन कलंत्री, उपस्थित होते.

कृषिमंत्री अब्दुल सत्तार पुढे म्हणाले की राज्यातील चारही कृषि विद्यापीठांनी बियाणे निर्मितीमध्ये उच्चांक केलेला असून त्यामुळे शेतकऱ्यांना बियाण्याचा पुरवठा करतांना अडचण येणार नाही, कृषि विद्यापीठातील काम करण्याच्या सर्व शास्त्रज्ञांचे काम हे शत्रू सैन्याबरोबर लढाई करणाऱ्या सैनिकाइतकेच मोठे आहे. सध्या शेतीमध्ये जमीनधारणा क्षेत्र घटक चालल्यामुळे शेतकऱ्यांना ड्रोन वापरताना अडचणी येऊ शकतात. यावर शेतकऱ्यांनी गटशेतीच्या माध्यमातून पर्याय शोधला पाहिजे. विद्यापीठानीही कमी खर्चामध्ये ड्रोन तयार केल्यास छोट्या शेतकऱ्यांनाही तो वापरता येईल. त्यामुळे खतांबरोबरच औषध फवारणी केल्यामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक फायदा होईल. कृषि विद्यापीठे परदेशातील विद्यापीठांबरोबर तसेच संस्थांबरोबर करीत असलेल्या सामंजस्य करारांमुळे संपूर्ण देश व परदेशातील विद्यापीठांनाही दिशा देण्याचे काम महाराष्ट्रातील कृषि विद्यापीठे करीत आहेत. कृषि विद्यापीठे ही पवित्र मंदिरे असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले.

राज्यातील चारही कृषि विद्यापीठाना संशोधनासाठी १०० कोटी रुपयाचे अनुदान वितरीत केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. मान्यवरांच्या हस्ते यावेळी जॉइंट ग्रेसको २०२३ च्या स्मरणीकेचे आणि चारही कृषि विद्यापीठाच्या प्रकाशनाचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी चारही कृषि विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचे प्रदर्शनाचे मोठे दालन उभे करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन कृषिमंत्र्यांच्या हस्ते झाले. यावेळी चारही कृषि विद्यापीठातील चार शास्त्रज्ञांना उत्कृष्ट शास्त्रज्ञ पुरस्कार कृषि मंत्र्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विषयातील प्राध्यापक डॉ. पवन कुलवाल, अकोला कृषि विद्यापीठातील डॉ. रामेश्वर कुऱ्हाडे, परभणी कृषि विद्यापीठातील डॉ. दिपक पाटील व दापोली कृषि विद्यापीठाच्या डॉ. भरत वाघमोडे यांचा समावेश होता.

डॉ. परिमलसिंग यावेळी म्हणाले की कृषि विद्यापीठांनी केलेल्या संशोधनाचा कृती संगम सिध्द होण्यासाठी अशा बैठकाची गरज आहे. यावेळी दापोली विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय सावंत यांचा सेवानिवृत्तीनिमित्त मंत्री महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वागत डॉ. सुनिल गोरटीवार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आनंद सोळंके यांनी तर आभार डॉ. हरिहर कौसडीकर यांनी मानले.



## समृध्दी महामार्गाचा दुसरा टप्पा म्हणजे उत्तर महाराष्ट्राच्या विकासाचा मानबिंदू : विखे

**शिर्डी, (वार्ताहर)** : महाराष्ट्राला समृध्द करणाऱ्या हिंदूहृदयसम्राट महाराष्ट्र समृध्दी महामार्गाच्या शिर्डी ते भरवीर या ८० कि.मी लांबीचा दुसरा टप्पा म्हणजे उत्तर महाराष्ट्राच्या विकासाचा मानबिंदू ठरेल, असा विश्वास महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केला. पश्चिम व उत्तर महाराष्ट्रासह मराठवाडा आणि विदर्भाला जोडला जाणारा विकासाचा सुवर्ण त्रिकोण ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

समृध्दी महामार्गावरील नागपूर ते शिर्डी या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले होते. या मार्गामुळे प्रवाशाचा वेळ वाचण्याचा सुखद अनुभव सर्वांना मिळाला. आता या महामार्गाचा दुसरा टप्प्याचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत होत असून, नगर जिल्ह्याच्या विकासात्मक दृष्टीने ऐतिहासिक घटना आहे. समृध्दी महामार्गाचे काम वेगाने पुढे जात आहे. त्याच पध्दतीने जिल्ह्याच्या विकासालाही या मार्गामुळे गती मिळेल असे सांगून मंत्री विखे म्हणाले की, पहिल्या टप्प्याचे उद्घाटन झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्याने मुंबई ते शिर्डी वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे गाडी सुरु झाली. आता समृध्दी महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचीही होत असलेली सुरुवात ही जिल्ह्याच्या दळणवळणाच्यादृष्टीने महत्वपूर्ण बाब ठरेल.

दुसऱ्या टप्प्यातील या महामार्गाचा लाभ सिन्नर येथील गोंदे इंटरचेंज येथून नाशिक, अहमदनगर, पुणे जिल्ह्यासह त्या गावातील नागरीकांना मोठा उपयोग होईल. घोटीपर्यंतचे अंतरही कमी होणार असून, या भागातील शेतकऱ्यांच्या शेतीमालाची वाहतूकही अतिशय कमी वेळात होईल याकडे लक्ष वेधून या महामार्गाची अहमदनगर जिल्ह्याची लांबी २९.४० कि.मी असून शिर्डी व अहमदनगर परिसरातील कृषि उद्योगांसह इतर व्यवसायांनाही चालना मिळून रोजगारवृध्दीच्या दृष्टीने या महामार्गावरील दळणवळण उपयुक्त ठरणार आहे. भविष्यात लवकरच या भागात लॉजेस्टीक पार्क, आयटी पार्क आणि शेतीपुरक उद्योगाच्या उभारणीसाठी महत्वपूर्ण निर्णय होणार आहे. जिल्ह्यातील औद्योगिक विकासासाठी सुध्दा समृध्दी महामार्गाचे मोठे सहकार्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## 'रिपाई'आठवले गटाचे शिर्डीत दोन दिवसीय अधिवेशन

**अकोले, (वार्ताहर)** : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह भाजपा व शिंदे गटाचे अन्य मंत्री, खासदार, आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली शिर्डी येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) पक्षाचे शनिवार व रविवारी (२७ व २८ मे) दोन दिवसीय अधिवेशन घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विजय वाकचौरे यांनी दिली .

यासंदर्भात अधिक माहीती देताना विजय वाकचौरे म्हणाले, २७ मे रोजी सकाळी ११ वाजता रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारणीची बैठक शिर्डी येथील हॉटेल इन पॅलेसमध्ये होणार आहे. बैठकीत रिपब्लिकन पक्षाचे नवनिर्वाचित आमदार नोकसेन (नॉगालँड) येथील एलिमा वन चांग, तुगसाँग सरदार येथील आमदार लिमटी चाबा चांग यांचे विशेष सत्कार करण्यात येतील. दुपारची वेळ कार्यकर्त्यांच्या भेटीसाठी राखीव ठेवण्यात आली असून नेते त्यांच्याकडून पक्ष पातळीवरील समस्यांवर चर्चा होईल.

रविवारी (२८ मे) सकाळी ११ वाजता मंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. संध्याकाळी ५ वाजता राहाता ते शिर्डी रस्ता, गोदावरी वसाहत, कांदा मार्केटसमोरील विखे पाटील सोसायटी पेट्रोल पंपासमोरील प्रांगणात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनाला प्रमुख अतिथी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांच्यासह रिपाई महीला आघाडी राष्ट्रीय अध्यक्षा सीमा आठवले, माजीमंत्री मधुकर पिचड, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे, जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डीले, आमदार बबनराव पाचपुते, आमदार राम शिंदे, आमदार मोनिका राजळे यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष व कार्यकर्ते हजर रहाणार आहेत.

## सोशल माध्यमावरील मैत्रीतून विधवेवर अत्याचार व ३० लाखांची फसवणूक

**संगमनेर, (वार्ताहर)** : शहरातील एका ३८ वर्षीय विधवा महिलेशी फेसबुकवर झालेल्या मैत्रीचा फायदा घेत, तिला लग्नाचे आमिष दाखवले. तिच्याकडून वेळोवेळी सुमारे ३० लाख रुपये घेवून, ते परत देण्यास नकार देत, तिच्या मुलीला जीवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी पिडीतेने शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन योगेश सुभाष टोपेकर, रा. आळंदी (पुणे) याच्याविरुध्द अत्याचार व फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, योगेश टोपेकर याची कोविड काळात फेसबुकवर पीडित महिलेची ओळख झाली होती. फेसबुकवर झालेल्या संभाषणातून ती विधवा असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याने या महिलेशी वेळोवेळी फोनवरून संपर्क साधत तिच्याशी जवळीक वाढवली. या ओळखीतूनच त्याचे या महिलेच्या घरी येणे जाणे सुरू झाले. तिच्याशी लग्न करण्याचे आमिष दाखवीत तिचा विश्वास संपादन करुन त्याने तिच्या इच्छेविरुद्ध संगमनेर येथील तिच्या राहत्या घरी आणि शिर्डीतील हॉटेलमध्ये वारंवार अत्याचार केले. सप्टेंबर २०२० ते १ मे २०२३ या काळात हा प्रकार घडला असून, या दरम्यान त्याने तिच्याकडून फोन पे, गुगल पे या ऑनलाईन प्रणालीद्वारे सुमारे ३० लाख ३७ हजार रुपये घेतले. पिडीतेने त्याच्याकडे पैशांची मागणी केली असता, त्याने मी तुझ्यासोबत लग्न करतो. पैशाबद्दल बोलू नकोस, नाहीतर तुझ्या मुलीस मारून टाकण्याची धमकी पीडित महिलेला दिली.

पैसे परत मिळावे यासाठी पीडित महिलेने वारंवार योगेश टोपेकर याच्याशी संपर्क साधला असता त्याने मोबाईल बंद करून टाकला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच, तिने आपली आर्थिक फसवणूक केल्याचा तसेच आपल्या इच्छेविरुद्ध वेळोवेळी एकटेपणाचा फायदा घेऊन अत्याचार केला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याबाबत तिने दिलेल्या फिर्यादीवरुन संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार पुढील तपास करीत आहेत.

## पाणी योजनेच्या कामाची चौकशी व्हावी; रिपाईचे कर्जतमध्ये उपोषण

**कर्जत, (वार्ताहर)** : जल जीवन मिशन अंतर्गत कोळवडी येथील झालेल्या पाणी योजनेच्या कामाची चौकशी व्हावी या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांच्यावतीने कर्जत पंचायत समिती कार्यालयासमोर आमरण उपोषण आंदोलन तालुका अध्यक्ष संजय भैलूमे व दादा उकिरडे यांच्या नेतृत्वाखाली गुरूवारी करण्यात आले.

या आंदोलनामध्ये एमआयएमचे तालुकाध्यक्ष अन्सार शेख, रिपब्लिकन पक्षाचे युवक शहराध्यक्ष सागर कांबळे, युवक तालुका उपाध्यक्ष लखन भैलुमे, शेखर राऊत, पणाजी कदम, संजय उकिरडे, गणेश दिवटे, दीपक उकिरडे, बी जी भैलूमे यांच्यासह अनेक जण सहभागी झाले होते.

यावेळी आंदोलन रिपब्लिकन पक्षाचे तालुकाध्यक्ष संजय भैलुमे यांनी बोलताना सांगितले की, कर्जत तालुक्यातील कोळवडी येथे जलजीवन मिशन अंतर्गत काम करण्यात आले आहे. केंद्र सरकारमार्फत हर घर जल या महत्वकांक्षी योजनेतून प्रत्येक कुटुंबापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन योजना सुरू केली आहे त्यानुसार तालुक्यातील कोळवडी येथे या योजनेअंतर्गत विहीर खोदाई, पाईपलाईन इत्यादीचे काम काम करण्यात आले आहे.

## देवळाली प्रवरात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन गटात राडा

**देवळाली प्रवरा, (वार्ताहर)** : देवळाली प्रवरा येथिल एका वरीष्ठ महाविद्यालयात दोन गटात धुमचक्री उडाली असून यात एका गटाच्या विद्यार्थ्यावर ब्लेडने वार केले असून महाविद्यालयाच्या प्रांगणात सुरु झालेली धुमचक्री सोसायटी डेपो चौकात दोन्ही बाजूने ४०० ते ५०० चा जनसमुदाय एकमेकांवर चालून येत होता. पोलीस वेळेवर पोहचल्याने मोठा अनर्थ टळला आहे. ही धुमचक्री नाजूक कारणातून घडल्याचे दबक्या आवाजात चर्चा सुरु होती. मात्र या प्रकरणात दोन्ही गटाच्या बाजूने राजकीय हस्तक्षेप झाल्याने सायंकाळपर्यंत गुन्हा दाखल झाला नव्हता.

याबाबत समजलेली माहिती आशी की, देवळाली प्रवरा येथिल कडू-कदम वस्ती रोडलगत अहमदनगर येथिल नामवंत संस्थेचे महाविद्यालयात आहे. याच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या दोन विद्यार्थ्यामध्ये नाजूक कारणातून वाद झाले. वाद विकोपाला जावून दोन्ही गटाकडून ४०० ते ५०० विद्यार्थी एकमेकांवर ताव खात होत होते. या विद्यार्थ्याच्या भांडणात येथिल सावकार व अवैध व्यावसायिक यांनी भाग घेतला. हे सर्व जण हातात काठ्या, दांडे, गज घेवून धावत आल्याने सोसायटी चौकातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद केली. दिवसभर दुकाने बंदच ठेवण्यात आली. दोन्ही गटांची आक्रमकता पाहता दंगलसदृश्य परीस्थिती निर्माण झाली होती. या बाबतची माहिती राहुरी पोलीसांना कळविण्यात आल्यानंतर पोलीस निरीक्षक मेघःशाम डांगे, पोलीस उप निरीक्षक सज्जन नाऱ्हेडा, पो.हे.काँ.प्रभाकर शिरसाठ, श्रीरामपूर येथिल रिर्झव्ह पोलीस फोर्स घटनास्थळी दाखल झाले. पोलीस दाखल होताच दोन्ही गटाच्या मोहरक्यांची धरपकड करण्यास सुरवात केली. ९ ते १० जणांना पोलीसांनी ताब्यात घेवून सरकारी वाहनाद्वारे राहुरी पोलीस ठाण्यात नेले.

तीन महिण्यापूर्वी याच महाविद्यालयात टाकळीमियाँ परिसरातील विद्यार्थ्याने महाविद्यालयाच्या प्रांगणात एका शिक्षकास श्रीमुखात मारुन बेदम मारहाण केल्याच्या घटनेवर येथिल प्राचार्याने पडदा टाकल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची हिम्मत वाढत गेल्याने विद्यार्थ्यांच्या दोन गटात धुमचक्री होवून दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती.

पठारे नामक विद्यार्थ्याच्या बाजूने एका राजकीय संघटनेच्या पदाधिकारी व खाजगी सावकार, अवैध गौण खनिज वाहतूक करणारे तरुण, अवैध व्यवसाय करणारे तरुण हातात दांडके, काठ्या, गज, कुऱ्हाड घेवून धावत आले. दुसऱ्या गटावर तुटून पडण्यापूर्वीच पोलीसांनी उघड्या डोळ्याने दोन्ही गटांची आक्रमकता पाहूनहि डोळेझाक केल्याने या सर्वांपैकी एकासहि अटक न केल्याने या सर्वांना पोलीसांचा आशिर्वाद आहे का? असा प्रश्न यावेळी निर्माण झाला.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या दोन्ही गटाकडुन राजकीय नेत्यांनी हस्तक्षेप करुन पोलीस ठाण्यात ठाण मांडून बसले होते. त्यामुळे सायंकाळपर्यंत कोणताही गुन्हा दाखल झालेला नव्हता. दोन गटातील धुमचक्री कोणाच्या तरी जीवावर बेतली असती. या घटनेनंतर देवळाली प्रवरात मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### विद्यार्थीनीच्या आईने दिली आत्महत्येची धमकी!

महाविद्यालय परिसरात दोन गटात धुमचक्री होवून एका विद्यार्थ्यावर ब्लेडने वार झालेले असताना या महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेणारी मुलगी परीक्षा देण्यास महाविद्यालयात जाते म्हणून घरुन महाविद्यालयात आली. टाकळीमियाँ रोड लगत राहणाऱ्या याच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या तरुणा बरोबर सैराट झाली. याची कुणकून महाविद्यालयीन विद्यार्थीनीच्या घरी लागताच तरुणीच्या आईने महाविद्यालयातील शिक्षकांनी माझी मुलगी आणून द्यावी, अन्यथा महाविद्यालयासमोर आत्महत्या करीन असा इशारा देताच धुमचक्रीतील काही विद्यार्थ्यांचा शोध घेत पोलीस महाविद्यालयात पोहचले. पोलीसांनी सैराट झालेल्या दोघांचे मोबाईल नंबर घेवून संपर्क केला असता या विद्यार्थीनीने मी स्वतः पळून आले आहे. आम्ही दोघांनीहि विवाह केला आहे. सायंकाळपर्यंत घरी पोहचतो असे सांगितल्याने शिक्षकांचा जीव भांड्यात पडला. मात्र तरीही विद्यार्थीनीच्या आईने मात्र मुलीच्या सैराट होण्यामागे शिक्षक जबाबदार असल्याचा आरोप केला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**

**कार्यालयाचा पत्ता : कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर**

**Walk in Interview (थेट मुलाखत)**

**सेवानिवृत्त उप-अभियंता (स्थापत्य) तसेच सेवानिवृत्त शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता/सहा. अभि. श्रेणी-२ (स्थापत्य) यांची सेवा करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी जाहिरात**

कुकडी सिंचन मंडळ, पुणे या कार्यालयाच्या अधिनिस्त असलेले कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर, पिन-४१४४०२ या कार्यालयात करार पध्दतीने पदे भरण्यासाठी जलसंपदा विभागातून सेवानिवृत्त झालेल्या उपविभागीय अभियंता/उपविभागीय अधिकारी (उपअभियंता संवर्ग) (स्थापत्य अभियंता) तसेच शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता/सहा. अभि. श्रेणी-२ (स्थापत्य) मुलाखतीद्वारे भरणेबाबत इच्छुक उमेदवारांनी लेखी अर्ज व सर्व कागदपत्रांसह मुलाखतीसाठी दि. ०५.०६.२०२३ रोजी सायंकाळी ०३.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, कुकडी वितरण बांधकाम विभाग, कोळवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर या कार्यालयात उपस्थित रहावे.

**अ) पदनाम, पदसंख्या व विविक्षीत कामाचे स्वरुप :**

| अ. क्र. | पदनाम | विविक्षीत कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता/सहा. अभि. श्रेणी-२ संवर्गातील स्थापत्य अभियंता | भूसंपादन, बांधकाम, सिंचन व्यवस्थापन, पाणी वापर संस्था स्थापन करणे इत्यादी |
| २ | उपविभागीय अभियंता(स्थापत्य) | पदसंख्या एकूण-०२ |

**ब) पात्रता व अनुभव :**
१) जलसंपदा विभागातून सेवानिवृत्त, विविक्षीत काम केल्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. २) कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणत्याही प्रकारची शिक्षा झालेली नसावी.

**क) मासिक परिश्रमिक** : सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दि. १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील अ. क्र. (ड) नुसार

**ड) सेवा कालावधी** : प्रथमतः ११ महिन्याकरिता

**ई) अट व शर्ती** : १) सेवा केव्हाही (११ महिन्यांच्या आत) संपुष्टात करण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता यांना राहील. २) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, दि. १७.१२.२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी बंधनकारक राहतील. ३) शासनाचे प्रचलित नियम/निर्देश तसेच सेवा करार बंधपत्र/हमीपत्र यामधील अटी बंधनकारक राहतील.

**फ) नियुक्तीची कार्यपध्दती** : थेट मुलाखतीच्या गुणानुसार.

**उपकार्यकारी अभियंता**
**कुकडी वितरण बांधकाम विभाग,**
**कोळवडी, ता. कर्जत, जि. अहमदनगर.**


## 'नागवडे'च्या थकीत वेतनाचे राजकारण नको : वायकर

**श्रीगोंदा, (वार्ताहर)** : सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या कामगारांचे काही तांत्रिक अडचणीमुळे थोडे पगार थकित असल्यामुळे कृपया कोणी त्याचे राजकारण करून लोकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण करून संस्थेची बदनामी करू नये, असे आवाहन कामगार युनियनचे सरचिटणीस आनंदराव वायकर यांनी केले आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात वायकर म्हणाले की, सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे कारखाना व्यवस्थापनाने कामगारांचे यापूर्वी कधीही पगार थकविलेले नाहीत. स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांनी पन्नास वर्ष कामगारांचे पालकत्व स्वीकारून त्यांच्या कष्टाचा योग्य मोबदला देऊन न्याय दिलेला आहे. तोच वारसा विद्यमान अध्यक्ष राजेंद्र नागवडे व संचालक मंडळाने चालविलेला असून नागवडे कारखान्यात कधीही कामगारांवर अन्याय केलेला नाही. शासनाने सन २०१४ मध्ये कामगार प्रश्नावर नियुक्त केलेल्या त्रिपक्षीय समितीत स्व. बापूंनी व सन २०२० मध्ये राजेंद्र नागवडे यांनी कामगार प्रश्नावर अतिशय सकारात्मक भूमिका मांडून कामगारांना चांगल्या सवलती देण्यामध्ये पुढाकार घेतलेला आहे. या दोन्ही कराराची अंमलबजावणी सर्वप्रथम नागवडे कारखान्याने केलेली असून त्यातील फरकाची रक्कमही देण्याचा प्रयत्न केलेला आहे हे सर्वांना ज्ञात आहे.

प्रतिवर्षी मे ते एप्रिल या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना १ मे कामगार दिनाचे औचित्य साधून कारखान्यामार्फत त्यांचा सन्मान करण्याची परंपरा स्व. बापूंनी ३५ वर्षांपूर्वी सुरू केलेली होती ती कारखाना व्यवस्थापनाने आजही चालू ठेवलेली आहे. मागील वर्षी कामगार युनियन आणि कारखाना व्यवस्थापन यांच्या समन्वयाने शंभर पेक्षा अधिक कामगारांना सेवेत कायम करण्यात येऊन त्यांना नियमानुसार पगार वाढीचा लाभ देण्यात आलेला आहे. फंडाचा भरणा सुद्धा दरमहा नियमितपणे कारखान्याने केलेला आहे. स्थानिक पातळीवर व्यवस्थापन व युनियन यांच्यामध्ये चांगल्या प्रकारचा समन्वय असून दिनांक १७ रोजी झालेल्या समक्ष चर्चेमध्ये दोन-तीन दिवसात पगार करण्याचे आश्वासन राजेंद्र नागवडे यांनी दिलेले असून अल्पावधीत सर्व सुरळीत होईल याचा आम्हाला विश्वास आहे. सेवानिवृत्त झालेल्या सेवकांची उपदानाची रक्कम कारखाना वेळोवेळी अदा करीत आहे.

आज महाराष्ट्रातील अनेक कारखान्यांच्या कामगारांचे पगार थकीत आहेत. काही कारखान्यांचे आठ ते दहा महिन्यापर्यंतचे पगार थकित आहेत. असे असताना सहकार महर्षी नागवडे सहकारी साखर कारखान्याचे कामगारांचे पगार थकीत असल्याचे कोणी राजकारण करू नये व लोकांच्या मनात संभ्रम निर्माण करून संस्थेची बदनामी करू नये असे आवाहन वायकर यांनी केले आहे. यावेळी कामगार युनियनचे प्रतिनिधी उपस्थित होते.


**U GRO CAPITAL LIMITED**
४ था मजला, टॉवर ३, इक्विनॉक्स बिझनेस पार्क, एलबीएस रोड, कुर्ला, मुंबई ४०००७०

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीची नोटीस**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सह सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) रूल्स २००२च्या नियम ८ व ९ मधील तरतुदीं अंतर्गत स्थावर मालमत्ता (तारण मालमत्ता) विक्री करिता ३० दिवसांची ई-लिलाव सूचना**

तमाम लोकांस आणि विशिष्ट कर्जदार व जामीनदारांस नोटीस देण्यात येते की, खालील वर्णन केलेली तारण मालमत्ता यू ग्रो कॅपिटल लिमिटेड (धनको) यांचेकडे गहाण/कब्जा असून धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याचा ताबा घेतला आहे. खालील नमूद थकबाकी आणि रक्कम पूर्ण परतफेड करेपर्यंत पुढील व्याज व खर्च या वसुलीकरिता खालील नमूद दिनांक व वेळेस 'जिथे आहे' व 'जसे आहे' तत्त्वावर ई-लिलावाने विक्री करायची आहे. राखीव किंमत, बयाणा रक्कम, बयाणा भरणेचा अंतिम दिनांक खाली तपशील नमूद केला आहे.

| कर्जदार/जामीनदाराचा तपशील | मागणी नोटीस तपशील | लिलावाचा तपशील | |
|---|---|---|---|
| १. अंबिका सेल्स<br>२. भूपेंद्र ऑटो<br>३. भूपेंद्र नंदकुमार रासने<br>४. पूनम भूपेंद्र रासने<br>**कर्ज खाते क्रमांक :**<br>एचसीएफपीयूएनएसईसी००००१०१६४८४ | **नोटीसचा दिनांक :**<br>०६-०३-२०२३<br>**थकबाकी रक्कम :**<br>रु. २,९७,८४,२७०/-<br>०६-०३-२०२३ अखेर | **राखीव किंमत** | रु. ४,१४,००,०००/- |
| | | **बयाणा रक्कम** | रु. ४१,४०,०००/- |
| | | **बयाणा अंतिम दिनांक** | २७-०६-२०२३ |
| | | **लिलावाचा दिनांक** | ३०-०६-२०२३ |
| | | **लिलावाची वेळ** | सकाळी ११ ते दुपारी ०१ |
| | | **वाढीव मूल्य** | रु. ५,००,०००/- |

**तारण मालमत्तेचा तपशील :** स्थावर मालमत्ता बांधकाम क्षेत्रफळ अंदाजे ४७५ चौ. मीटर पाचवा मजला, ''कस्तुरी प्लाझा अपार्टमेंट कंडोमिनियम'' सीटीएस नं. ३८०/२, क्षेत्रफळ अंदाजे १०५६ चौ. मीटर, अहमदनगर, तालुका-अहमदनगर, महाराष्ट्र-४१४००१.

**दिनांक : २६-०५-२०२३**
**ठिकाण : अहमदनगर, महाराष्ट्र**

**स्वा/- प्राधिकृत अधिकारी**
**यूग्रो कॅपिटल लिमिटेड करिता, authorised.officer@ugrocapital.com**